**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- ०८.०७.२०१९**

**मंडळअधिकारी श्री.भार्डीकर, विरेगाव मंडळ व तलाठी श्री.गुल्लापेल्ली सजा कार्ला मंमदाबाद जि.जालना यांना 14,000/- रुपयाची लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना पथकाने रंगेहात पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | १) श्री. भागेश भिमराव भार्डिकर वय ४९ वर्ष,व्यवसाय-मंडळ अधिकारी, विरेगाव ता.जि.जालना रा.प्लॉट नं.२८ मल्हार निवास,कांचननगर जुना जालना ता.जि.जालना<br>२) श्री. श्रीकृष्ण रामदास गुलापेल्ली वय ५१ वर्ष,व्यवसाय-नौकरी,तलाठी , सजा-कारला ,मंमदाबाद ता.जि.जालना रा.सरस्वती जिगिंग कंम्पाउंड ,मस्तगड जालना, ता.जि. जालना. |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.०८.०७.२०१९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | १४,०००/- रुपये (पहीला हप्ता म्हणून) |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.वि.ल.चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, तक्रारदार यांचे सासरे हे वयोवृध्द व अजारी असल्याने त्यांचे सर्व कामे तक्रारदार हेच करतात तक्रारदार यांचे सासरे यांची मौजे माळीपींपळगाव येथे गट नं.३०६ मध्ये एक हेक्टर शेत जमीन आहे सदर शेत जमिनीच्या ७/१२ उता-यावर तक्रारदार यांचे सास-यांचे आडनावात चुकी झालेली होती. तसेच तक्रारदार यांचे मामेसासरे यांचे देखील अडनावात चुकी झालेली होती. तक्रारदार यांचे सासरे व मामेसासरे यांनी त्यांना सांगीतले होते की, ७/१२ वर झालेल्या अडनावात दुरुस्ती तलाठी यांचेकडुन करुन आणा व ७/१२ उता-यावर फेर नंबर टाकुन आण असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार हे माळीपींपळगावचे तलाठी श्री.गुल्लापेल्ली यांना जावुन भेटले व त्यांचे सासरे व मामेसासरे यांचे अडनावात दुरुस्ती करुन व ७/१२ उता-यावर फेर नंबर टाकण्या बाबत विनंती केली असता त्यावेळी तलाठी यांनी अडनावात दुरुस्ती करण्यासाठी प्रत्येकी सहा हजार रुपये दयावे लागतील व फेर नंबर टाकायचे मंडळअधिकारी यांना वेगळे पैसे द्यावे लागतील. त्यानंतर तक्रारदार हे मंडळअधिकारी श्री.भार्डीकर यांना जावुन भेटले व फेर नंबर टाकणेसाठी बोलले असता मंडळअधिकारी श्री.भार्डीकर यांनी तक्रारदार यांचेकडे २५०००/- रुपये द्यावे लागतील असे सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे सासरे व मामे सासरे यांना फोनवर तलाठी व मंडळअधिकारी हे सदर कामासाठी पैसे मागत असले बाबत सांगीतले त्यावेळी त्यांनी पैसे द्यायचे नाहीत तुम्ही तक्रार करा तसेच तक्रारदार यांची देखील तलाठी व मंडळअधिकारी यांना पैशे द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि जालना येथे समक्ष येवुन तक्रार दिली.

सदर तक्रारी वरुन दि.१७/०६/२०१९ रोजी तक्रारदार हे तलाठी श्री.गुल्लापेल्ली व मंडळअधिकारी श्री.भार्डीकर यांचे कामकाजाची खोली कांचननगर जुना जालना येथे पंचामसक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता तलाठी श्री.गुल्लापेल्ली व मंडळअधिकारी श्री.भार्डीकर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मौजे माळीपींपळगाव येथील गट नं.३०६ मध्ये ७/१२ वर झालेल्या आडनावात दुरुस्ती व फेर करण्यासाठी पंचासमक्ष तडजोडअंती २४,०००/-रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

**त्यावरुन दि.०८/०७/२०१९ रोजी वरील आरोपीतांनी मा.जिल्हाधिकारी कार्यालय येथे सापळा आयोजित केला असता आरोपी नंबर १. मंडळ अधिकारी श्री.भार्डिकर यांचे सांगणेवरुन आरोपी नंबर २.तलाठी श्री.गुल्लापेल्ली यांनी पंचासमक्ष पहीला हप्ता म्हणून १४०००/-रुपयाची लाच स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून पो.ठाणे तालुका जालना येथे वरील** आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.७९७२७२६१०१ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना